## जिल्हाधिकारी यांजकडून

### जिल्हा कोल्हापूर

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ खालील अधिसूचना.*

## अधिसूचना

### (नमुना - १अ)

क्रमांक कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/५०४/इचलकरंजी/४९१/२०२५.— ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे, "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी. सॅन्क्शन/यूडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत इचलकरंजी येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली सर्व्हे नंबर ४८३/१ पै., ४८३/२ पै., ४८३/३ पै., ४८३/४ पै., ४८३/५ पै., ४८३/६ पै. (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) या जमिनी आरक्षण क्र. II/४०, "सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट ॲन्ड कॉमन इफ्लुएंट प्लॅन्ट", तसेच आरक्षणास असणारा पोहच रस्ता १८ मी. रुंद विकास योजना रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहे. (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२६ अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ चे पत्र क्र. इमपा/नरवि/१४२५/प्र.क्र./१९४८/२५ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खालील अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०६/यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. एम.आय.एस.-११/२०१४/सीआर-७७(पार्ट-२)/ए-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ अन्वये, भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत भूसंपादनाच्या कार्यवाहीसाठी सुमारे १०,००० हे. क्षेत्राच्या मर्यादेत समुचित शासन म्हणून शासनाचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगर रचना अधिनियम अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींच्या संदर्भात लागू होत नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ८ मार्च २०१९ चे पत्र क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना उक्त भूसंपादन अधिनियमातील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतच परिशिष्ट २ व ३, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींचा अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेत आरक्षण क्र. II/४०, "सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट ॲन्ड कॉमन इफ्लुएंट प्लॅन्ट", तसेच आरक्षणास असणारा पोहच रस्ता १८ मी. रुंद विकास योजना रस्ता यासाठी आरक्षित केलेल्या जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता असल्याबाबत समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची खात्री झाली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कम उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियमाच्या १२६ पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, कोल्हापूर उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

त्याचप्रमाणे उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गावाचे नाव : मौजे इचलकरंजी**

| अ.क्र. | नगर भूमापन क्र. किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सीमा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | सर्व्हे नंबर ४८३/१ पै. | १४८६ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/१ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८५.<br>दक्षिण - सर्व्हे नंबर ४८३/२. |
| २. | सर्व्हे नंबर ४८३/२ पै. | ६३३ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/२ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/१.<br>दक्षिण - सर्व्हे नंबर ४८३/३. |
| ३. | सर्व्हे नंबर ४८३/३ पै. | ८०३ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/३ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/२.<br>दक्षिण - सर्व्हे नंबर ४८३/४. |
| ४. | सर्व्हे नंबर ४८३/४ पै. | २९११ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/४ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/३.<br>दक्षिण - सर्व्हे नंबर ४८३/५. |
| ५. | सर्व्हे नंबर ४८३/५ पै. | ३४९२ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/५ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/४.<br>दक्षिण - सर्व्हे नंबर ४८३/६. |
| ६. | सर्व्हे नंबर ४८३/६ पै. | ६९३६ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/६ पै. उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/५.<br>दक्षिण - वि.यो. रस्ता. |
| ७. | सर्व्हे नंबर ४८३/६ पै. (१८मी. वि.यो. रस्ता). | १७५ चौ.मी. | पूर्व - सि.स.नं. ४८३/६ पै उर्वरित क्षेत्र.<br>पश्चिम - ओढा पड क्षेत्र.<br>उत्तर - सर्व्हे नंबर ४८३/६.<br>दक्षिण - रस्ता. |

**एकूण १६४३६ चौ.मी.**

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे इचलकरंजी, तालुका हातकणंगले, सर्व्हे नंबर ४८३/१ पै., ४८३/२ पै., ४८३/३ पै., ४८३/४ पै., ४८३/५ पै., ४८३/६ पै. ही जमीन इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्र. II/४०, "सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट ॲन्ड कॉमन इफ्लुएंट प्लॅन्ट", तसेच आरक्षणास असणारा पोहच रस्ता १८ मी. रुंद विकास योजना रस्तासाठी भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** :- आरक्षण क्र. II/४०, "सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट ॲन्ड कॉमन इफ्लुएंट प्लॅन्ट", तसेच आरक्षणास असणारा पोहच रस्ता १८ मी. रुंद विकास योजना रस्ता यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारे लाभ** :- पायाभूत सुविधा, सोयीसुविधा.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा ............... तालुका ............... गावचे नाव ...............**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| निरंक | निरंक | निरंक |

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

निरंक

**टीप** : उक्त जमिनींचा नकाशा विशेष भूमी संपादन अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, २२ मे २०२५.

---

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**अंतिम अधिसूचना**

क्रमांक पमज/कावि/५/२०२५.— शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक टी.एल.सी.-१०६९/३२८१० चे (विशेष) दिनांक १ नोव्हेंबर १९७० अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याचे कलम ४ पोट-कलम *(१)* च्या परंतुका अन्वये राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत त्याचा वापर करून मी, जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी, पुणे, पुणे जिल्हा याद्वारे दिनांक २७ जानेवारी २०२५ पासून

(अ) पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील कात्रज या गावची कात्रज-१, कात्रज-२, कात्रज-३ व कात्रज-४ या चार गावांमध्ये विभागणी करून त्यांच्या सीमामध्ये बदल करीत आहे. आणि

(ब) असा निर्देश देत आहे की,

(१) कात्रज गावाच्या क्षेत्र भूमापन क्रमांक (अनुसूची - अ मध्ये) समाविष्ट असलेले स्थानिक क्षेत्र पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील कात्रज-१ या नावाने ओळखण्यात येणारे वेगळे नवे महसुली गाव होईल आणि

(२) उरलेले क्षेत्र (अनुसूची - ब) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कात्रज-२, कात्रज-३ व कात्रज-४ गावे होईल.

(३) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कात्रज या गावाचे सोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या कात्रज-१, कात्रज-२, कात्रज-३ व कात्रज-४ या नावाने ओळखण्यात येणाऱ्या गावामध्ये रूपांतरित करीत आहे.

(४) कात्रज-१, कात्रज-२, कात्रज-३ व कात्रज-४ या गावांच्या रहिवाश्यांचे दोन्ही गावांमध्ये गुरे चरणेकामी, स्मशानभूमी, गावठाण अस्तित्वात असलेले रस्ते इत्यादी वापरात असलेल्या सार्वजनिक बाबींवर त्यांचे समान हक्क राहतील.